मिहान प्रकल्प, नागपूर करिता मौजे खापरी (रेल्वे), नागपूर येथील आबादी सरकारची जमीन संपादित करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. मविवि-१२१९/प्र.क्र.३६/२८-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि. १६ जुलै, २०१९

<u>वाचा</u> : १. शासन निर्णय क्र.एव्हीएन-१००५/प्र.क्र.१६६/०५/२८-अ, दि.२६.०६.२००६
२. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. राजस्व/ब-१/कार्गो/कावि-९८६/२००६, दि.२८.०८.२००६
३. शासन निर्णय क्र.एव्हीएन-१००५/प्र.क्र.१६६/०५/२८-अ, दि.४.०७.२००९
४. शासन निर्णय क्र.एव्हीएन-१००८/प्र.क्र.१७१/०८/२८-अ, दि.१०.०३.२०१०
५. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं-२०१७/भूस/खापरी (रेल्वे)/२०१६-१७/१४४, दि.२६ नोव्हेंबर २०१८
६. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.राजस्व/ब-१/सिआर-१९/कावि-६३२/२०१९, दि.६.०७.२०१९

<u>**प्रस्तावना :**</u>

शासन निर्णय दि.२६.०६.२००६ अन्वये मिहान प्रकल्पासाठी ८८५.०८ हे. आर खाजगी व १८२.४१ हे.आर शासकीय अशी एकूण १०६८.२१ हे. आर अतिरिक्त जमीन संपादनास मान्यता देण्यात आली आहे. यानुसार, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी त्यांचे दि.२८.०८.२००६ चे आदेशान्वये ही जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस हस्तांतरीत केली आहे.

२. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस हस्तांतरीत केलेल्या शासकीय जमिनीमध्ये मौजे खापरी येथील एकूण ७ सर्व्हे नंबर मधील १९.५० हे.आर. जमीनीचा समावेश होता. तथापि, या जमिनीपैकी स.क्र.२२७ मधील आराजी २.४१ हे.आर व स.क्र.२२८ मधील आराजी ०.८१ हे.आर. क्षेत्र गावनमुना ७/१२ वरुन आबादीचे क्षेत्र असल्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे निदर्शनास आले. मौजे खापरी (रेल्वे) चा पुनर्वसनात समावेश नसल्यामुळे आबादीचे सदर क्षेत्र परत करण्यात येत असल्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने जिल्हाधिकारी, नागपूर यांना दि.२७.०८.२००८ अन्वये कळविले तसेच खापरी (रेल्वे) गावाचे सर्व्हे क्र.२२७ व २२८ वरील महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे नाव कमी करुन परत आबादी सरकार अशी नोंद घेण्याबाबत विनंती केली.

३. दरम्यानच्या काळात मिहान प्रकल्पासाठी संपादित करावयाच्या १८२.४१ हे.आर. शासकीय जमिनीपैकी मौजे तेल्हारा येथील १.२४ हे.आर. व दहेगाव येथील ०.९२ हे.आर. अशा एकूण २.१६ हे.आर. जमिनीवर खाजगी मालमत्ताधारकांचे हक्क असल्याचे निदर्शनास आले होते. सबब, शासन निर्णय दि. ४ जुलै २००९ अन्वये हे २.१६ हे. आर. क्षेत्र खाजगी जमीन म्हणून संपादन करण्यास तसेच दि. २६.०६.२००६ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करुन मिहान प्रकल्पासाठी ८८५.८० हे. खाजगी जमिनीऐवजी ८८७.९६ हे. खाजगी जमीन व १८२.४१ हे. शासकीय जमिनीऐवजी १८०.२५ हे. शासकीय जमीन संपादित करण्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

४. यानंतर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने मौजे खापरी (रेल्वे) येथील आबादीचे वरीलप्रमाणे नमूद क्षेत्र (**स.क्र.२२७ मधील आराजी २.४१ हे.आर व स.क्र.२२८ मधील आराजी ०.८१ हे.आर. क्षेत्र**) संपादनास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला. यानुसार, शासन निर्णय दि.१० मार्च २०१० अन्वये सदर जमीन जिल्हाधिकारी, नागपूर यांनी संपादित करुन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस हस्तांतरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

५. तथापि, सदर क्षेत्राचे ७/१२ वरील महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे नाव कमी करुन पूर्ववत आबादी सरकार अशी नोंद न झाल्याने भूसंपादनाची कार्यवाही करण्यास अडथळा निर्माण होत असल्याने सदर प्रकरणी शासन निर्णयात दुरुस्ती करण्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने विनंती केली आहे. याअनुषंगाने, शासन निर्णय दि.१० मार्च २०१० मध्ये सुधारणा करण्यात येऊन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

नागपूर येथील आंतरराष्ट्रीय प्रवासी व मालवाहतूक विमानतळ (मिहान प्रकल्प) विकसित करण्यासाठी संपादित करावयाच्या १०६८.२१ हे. आर जमिनीच्या तपशीलात शासन निर्णय दि.४ जुलै २००९ अन्वये सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार मिहान प्रकल्पासाठी ८८७.९६ हे.आर खाजगी जमीन व १८०.२५ शासकीय जमीन संपादन करण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. आता पुन्हा सदर तपशीलात सुणारणा करण्यात येत असून मिहान प्रकल्पासाठी ८८७.९६ हे.आर खाजगी जमिनीऐवजी ८९१.१८ हे. खाजगी जमीन व १८०.२५ हे. आर शासकीय जमिनीऐवजी १७७.०३ हे.आर शासकीय जमीन संपादन करण्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार, अतिरिक्त संपादित करावयाच्या ३.२२ हे.आर. खाजगी जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

क्र.	गावाचे नाव/सर्व्हे क्रमांक	संपादित करावयाची जमीन (हे.आर.)
१.	खापरी (रेल्वे), नागपूर सर्व्हे क्र.२२७ आराजी	२.४१
२.	खापरी (रेल्वे), नागपूर सर्व्हे क्र.२२८ आराजी	०.८१
	एकूण	**३.२२**

३. उपरोक्त तक्त्यात नमूद क्षेत्रानुसार भूसंपादनासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर क्षेत्र संपादित करण्यापूर्वी सदर ३.२२ हे.आर. क्षेत्राच्या ७/१२ वरील महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे नाव कमी करुन परत आबादी सरकार अशी नोंद घेण्याबाबत कार्यवाही जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाने तातडीने करावी.

४. सदर भूसंपादनामुळे प्रकल्पबाधित होणाऱ्या बाधित घरांचे आणि बाधितांचे पुनर्वसनासाठी अतिरिक्त भूसंपादनाची आवश्यकता भासल्यास आवश्यक जमीन संपदानाचा प्रस्ताव शासनाकडे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. यांनी सादर करावा.

५. सदर प्रकरणी निर्गमित करण्यात आलेला दि.१० मार्च २०१० रोजीचा शासन निर्णय याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०७१६१७३४१४५९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e6456454666136340 0c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, ou=GAD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2019.07.16 17:39:14 +05'30'

(भ. बु. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सह सचिव
४. अप्पर मुख्य सचिव (महसूल)/ (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानत विकास कंपनी, मुंबई
७. विभागीय आयुक्त, नागपूर
८. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
९. जिल्हाधिकारी, नागपूर
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/नागपूर.
१२.निवड नस्ती.